(१२)

तातडीचे

**कायम विनाअनुदान (मराठी माध्यम)**

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/०८-०९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक

[stamp] 6 JUN 2008

प्रति,

सचिव
कर्तव्य प्रतिष्ठान, बावधन
ता.. मुळशी जि. पुणे.

**विषय:-** २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

**संदर्भ :-**

१. शासन पत्र क्रमांक नमाशा/२००६/( १५८/२००६ )/माशि-१ दिनांक १६.५.२००६ व दिनांक ३१.५.२००६
२. या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य ३/१४/नमाशा/पुवि/२००६, दिनांक ७.६.२००६ व दिनांक १५.६.२००६
३. शासन पत्र क्रमांक नमाशा/२००६(४५८/०६)माशि१,दि.१८.७.२००६
४.. या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य-३/१४/नमाशा/रद्द/पुवि/०६, दिनांक ३१.७.२००६
५. शासन पत्र क्रमांक न्यायाप्र/२००८/(१९२/०८) माशि १ , दिनांक १७.३.२००८
६. या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दिनांक २२.४.२००७ व दिनांक २७.५.२००८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येत की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे असे उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार कळविण्यात आले होते.

तथापी संदर्भ क्रमांक ३ नुसार शासनाने म.रा.शि.महामंडळ यांनी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २८१७/२००६ या याचिकेवर दिलेल्या निर्णयानुसार दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीत दिलेले नविन माध्यमिक शाळा परवानगी आदेश रद्द केले होते. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये शाळा परवानगीचे आदेश रद्द झाल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचे मार्फत आपणांस कळविण्यात आले होते आता उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ५ नुसार शासनाने दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीतील परवानगी आदेश कायम राहतील असे कळविलेले आहे. त्यानुसार आपल्या शाळेस परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. आपण परवानगी मिळालेल्या ठिकाणी शाळा सुरु केली नसल्यास शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ अन्वये [illegible] नुतनीकरणाने शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून परवानगी देण्यात येत आहे.

[illegible] शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ नुसार पुढील शैक्षणिक वर्षात (२००८-०९) शाळा सुरु न केल्यास यानंतर नुतनीकरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. व सदर शाळेचे परवानगी आदेश रद्दबातल झाले असे गहित धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | सचिव कर्तव्य प्रतिष्ठान, बावधन ता..मुळशी जि. पुणे. | बावधन , पुणे | आठवी | मराठी |

कायम-विना अनुदान

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे. आपण शाळा सुरु केली असल्यास तसे लेखी स्वरुपात तात्काळ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद व या कार्यालयास कळवावे.

१. आपल्या संस्थेने वरती नमुद केलेल्या नविन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात [illegible]

अध्यक्ष
कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन
''इंद्रप्रस्थ क्रांतीनगर' वडगांव (बु.।।)
पुणे-४११०४१.

मुख्याध्यापक
प्रा. डॉ. सुधाकरराव जाधवर माध्य. विद्यालय
बावधन, ता. मुळशी, जि. पुणे-२१.

102

... सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यात ... आपण संस्थेवर बंधनकारक राहील, ... प्रतिज्ञापत्र शपथपत्र (रु.१०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावे.

५. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६. "कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा" असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.

७. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने/शाळेने संबंधित अधिकाऱ्यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

९. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

१०. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

11. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबीत नाही.

१२. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील 1 ते १२ विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

स्थळप्रतीवर शि.उ. सं. यांची सही आहे.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रत

माहिती व कार्यवाहीसाठी

1. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.

२/- आपण संबंधित संस्थेची अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

... शिक्षण संचालक, ... राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सादर

२. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना सविनय सादर

मुख्याध्यापक
प्रा. डॉ. सुधाकरराव जाधवर माध्य. विद्यालय
मारधन, ता. मुळशी, जि. पुणे-२१.

अध्यक्ष
कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन
''इंद्रप्रस्थ क्रांतीनगर' वडगांव (बु.।।)
पुणे-४११०४१.

३९८२३१२६

**कायम विनाअनुदान**
याचिका क्रमांक २८९७/२००६
एस.एल.पी.१४७६८ /२००६

जा.क्र.माध्य.३ (९८) /नमाशा/मान्यता/पुवि/२००९-१०
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग
पुणे- १ यांचे कार्यालय
दिनांक ः
9 DEC 2009

प्रति

सचिव
कर्तव्य प्रतिष्ठान, बावधन
ता.मुळशी जिल्हा पुणे

विषय ः सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत...

( मूळ परवानगी वर्ष २००५-०६)

संदर्भ ः
१) शासन पत्र क्र.नमाशा /२००६ /(१५८ / २००६) / माशि १ दि.१६ / ०५/२००६( अ. क्र.१८९)
२)या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य.३ /१४ /नमाशा /पुवि /२००६ दि.७ /६ /२००६ व दि.१५ /६/२००६.
३)शासनपत्र क्र.नमाशा /२००६(४५७/ २००६)माशि-१ दि.१८/०७/२००६
४)या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य -३ /१४ /नमाशा /रदद /पुवि /२००६ दि.३१ /०७ /२००६
५)शासनपत्र क्रमांक -न्यायाप्र /२००८(१९२ / २००८) माशि १ दि.१७ / ०३/२००८
६) या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दि. २२ / ०४/२००७ व २७ /०५ /२००८
७) या कार्यालयाचे पत्र क्र.दि.१६ /०६ /२००८
८) शासनपत्र क्रमांक माशानू -२००८ /(५९४ / ०८) माशि-१ दि. ७ /७ /२००८
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र क्रमांक जिप /शिक्षण /माध्य /३७४९ /०९ दि.०३ /१२ /०९
१०)शासन निर्णय दिनांक १९ /१० /०७

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करून खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून २००८ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणारया सर्व बाबींची तसेच खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे. (नुतनीकरण) प्रत्यक्षात सुरू वर्ष सन २००७-०८

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | सचिव कर्तव्य प्रतिष्ठान बावधन ता.मुळशी जिल्हा.पुणे | बावधन, पुणे | आठवी | मराठी |

## कायम विनाअनुदान

१.आपल्या संस्थेची वरती नमूद केलेल्या नवीन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२.शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विदयार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
३.कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेला शाळा असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा पध्दतीने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.
४.सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकारी यांचेशी /शासनाशी पत्रव्यवहार करताना कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
५.सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणारया आदेशाचे उदा.विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी(सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
६.सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
७.इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकद्रष्टया मागासलेल्या विदयार्थ्यांसाठी (इ.बी.सी) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कायोलयाकडे पाठविण्यात यावे.
८.जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विदयार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वि कारण्यात येऊ नये.
९.महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीर्ज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी किंवा वर्गणी विदयार्थ्यांकडून जमा करण्यात येऊ नये.
१०.माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.
११.शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र एस.एस.एन.२१०३ /(५० /०३) माशि-२ दिनांक २७ मे २००३ मधील

अध्यक्ष
कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन
''इंद्रप्रस्थ क्रांतीनगर' वडगांव (बु.॥)
पुणे-४११०४१

मुख्याध्यापक
प्रा. डॉ. सुधाकरराव जाधवर माध्य. विद्यालय
बावधन, ता. मुळशी, जि. पुणे-२१.

प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल .
१२ . संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १00 बिंदु रोष्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल .
१३ . शिक्षक /कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कडून मंजुर करून देण्यात येईल .
१४ . माध्यमिक शाळा संहिता कलम ८१ नुसार सर्वप्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल .
१५ . शालेय वातावरण इमारत प्रयोगशाळा इ . बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील .
१६ . माध्यमिक शाळा संहिता कलम ४२ . १ अन्वये कार्यबळ गट समिती सभेच्या पूर्वपरवानगीशिवाय जादा
आकारण्यात येणार नाही .
१७ . माध्यमिक शाळा संहिता नियम क . १ . २ (१७) अन्वये शाळेत पालक शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आ
करणे आवश्यक आहे .
१८ . जनहितार्थ याचिका क ४८३ /0४ मधील मा . सर्वोच्च न्यायालयाने दि . १४ . 0४ . २00९ रोजी " शाळामध्ये अ
सुरक्षा राबविणे" संदर्भात दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहील .
जनहितार्थ या . क . ४८३ /0४ मध्ये मा . सर्वोच्च न्यायालयाने दि . १४एप्रिल २00९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खाली
बाबींची /अटींची पूर्तता करण्याचे अटीवरच सादर परवानगी देण्यात येत आहे . खालील बाबींबाबतचा तपासणी अहवा
प्रथम मान्यता प्रस्तावाच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील .
१ . शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी .
२ . शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत .
३ . शाळेचा संबंधित कर्मचारीवृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्या
यावे .
४ . सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत
विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र
सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील .
५ . प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी . संबंधित अधिकारी यांनी (National
Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे . वरील काम जे अधिकारी /कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर
कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी .
संदर्भ- १ . शासन पत्र क्रमांक - याचिका-२00९ /प्र . क्र . २४४ /प्राशि-४ /दि . १९ सप्टेंबर २00९
२ . संचालनालयाचे पत्र क्र संकीर्ण-२00९ /६४११६ /याचिका /१५क (८)९३४४ दि . २४ सप्टेंबर २00९ .
वरील अटींची पूर्तता झाल्याची खात्री करूनच प्रथम मान्यता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे .
इतर अटी -
१ . संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५0 व संस्था नोंदणी अधिनियम १८६0 अगर केवळ मुंबई सार्व
जनिक विश्वस्त अधिनियम १९५0 प्रमाणे नोंदणीकृत आहे .
२ . संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत .
३ . सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही .
४ . संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत . अथवा संस्थेने चालविलेल्या
शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही .
५ . सदर संस्थांमार्फत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू
नाही .
वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रदद झाल्याचे
समजण्यात येईल .
आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३,१ नुसार शाळा सुरू झाल्यापासुन एक महिन्याचे
आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे . तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित
केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा .

सही/-
( बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करिता

**[illegible] शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.**

प्रतिलिपि
१ . शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित
त्यांना वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची
तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थांविरूध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या
कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा . सदर नवीन माध्यमिक शाळेस
प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून
तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी .
२ . मा . उपसचिव शालेय शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२
३ . मा . शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे १ यांना सविनय सादर

अध्यक्ष
कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन,
इंद्रप्रस्थ क्रांतीनगर [illegible] (बु.II)
पुणे-४११०४१.

मुख्याध्यापक
प्रा. डॉ. सुधाकरराव जाधवर माध्य. विद्यालय
बावधन, ता. मुळशी, जि. पुणे-२१.